# विलास सहकारी साखर कारखाना लि.

**वैशालीनगर, निवळी, ता.जि. लातूर (महाराष्ट्र)**

**फोन :-** ९४२२४७७६३०, ९४२२०७७६३० **ई-मेल:** vilassugar1@gmail.com


जा.क्र.विलास/सा.प्र./अ.वा.स.सभा/१००८/२०२६-२७ दिनांक : ३०.०७.२०२६

## अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
## (फक्त सभासदांकरिता)

आपल्या विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर, निवळी, ता.जि.लातूर या संस्थेची सन २०२५-२६ या वर्षाची 'अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा' **शनिवार, दिनांक १५.०८.२०२६ रोजी,** दुपारी ०१.३० वाजता, **हॉटेल वैष्णव, बँक्वेटस् हॉल, साई नाका, 'डी' मार्ट रोड, लातूर** येथे **कारखान्याच्या अध्यक्षा श्रीमती वैशाली विलासराव देशमुख मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली** आयोजित केली आहे. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

### -: सभेपुढील विषय :-

०१. दिनांक २९.०९.२०२५ रोजी झालेल्या तेविसाव्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

०२. दिनांक ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६ या वर्षाच्या कामकाजाचा संस्थेच्या मा.संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल स्विकारणे व त्याची नोंद घेणे.

०३. दिनांक ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६ या कालावधीतील नफा-तोटा पत्रकास व दिनांक ३१.०३.२०२६ रोजीच्या ताळेबंदास मंजुरी देणे, एफ.आर.पी. पेक्षा जादा ऊस दर अदा करणेसाठी किंमत चढ-उतार निधी व इतर निधी वापरास तसेच युनिट-१ व युनिट-२ कडील अंतिम ऊस दरास मान्यता देणे.

०४. दिनांक ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६ या कालावधीच्या हिशोबाचा मे.व्ही.पी.पाटील ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस, लातूर, वैधानिक लेखापरिक्षक यांनी सादर केलेल्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षकाच्या हिशोब तपासणी अहवालावर कार्यालयाने तयार केलेला दोष दुरुस्ती अहवाल मा.संचालक मंडळाच्या शिफारशीप्रमाणे स्विकारणे व त्यास मान्यता देणे.

०५. सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकापेक्षा जो कमी / अधिक खर्च झाला आहे त्यास मंजूरी देणे व सन २०२६-२७ वर्षाकरीता मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकाची नोंद घेवून त्यास मान्यता देणे.

०६. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता शासनमान्य लेखापरीक्षकाच्या नामतालिकेमधील वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व लेखापरीक्षण शुल्क ठरविणे.

०७. सभासद व कर्मचाऱ्यांना सवलतीच्या दराने साखर विक्री करण्यास मंजुरी देणे.

०८. कारखान्याच्या विविध ऊस विकास योजनांना मंजुरी देणे.

०९. कारखान्याच्या प्रशासकीय इमारत बांधकामाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

१०. युनिट-१ कडील स्क्रॅप विक्री बाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेवुन त्यास मान्यता देणे.

११. वार्षिक अहवाल व आर्थिक पत्रके कारखाना वेबसाईटवर प्रसिद्ध करून मा.सभासदांना अवगत करणे, तसेच इतर डिजीटल माध्यमाद्वारे मा.सभासदांना पाठविणे बाबत निर्णय घेणे.

१२. युनिट-२ येथे कारखाना विस्तारीकरण करणेबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेवून खर्चास मान्यता देणे.

१३. युनिट-२ येथे दोन पक्के साखर गोडावून उभारणी करणेबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेवून खर्चास मान्यता देणे.

१४. युनिट-२ येथे दुहेरी स्त्रोत (Dual Feed) पध्दतीने इथेनॉल निर्मिती करणेसाठी डिस्टीलरी प्रकल्पाचे आधुनिकीकरण करणेबाबत विचार करणे.

१५. युनिट-२ येथे कॉम्प्रेस्ड बॉयोगॅ स (सी.बी.जी.) प्रकल्प उभारणी करणेबाबत निर्णय घेणे.

१६. मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

मा.संचालक मंडळाच्या आदेशावरुन

*स्वाक्षरित/-*

आबासाहेब पाटील

**कार्यकारी संचालक**

**दिनांक :-** ३०.०७.२०२६

**स्थळ :-** वैशालीनगर, निवळी

**-: विशेष सूचना :-**

१) सभेस प्रवेश देणे सोईचे व्हावे म्हणून अहवालासोबत जोडलेली प्रवेश पत्रिका मा.सभासदांनी सभेस येताना बरोबर आणावी व संस्था प्रतिनिधींनी सभेस येताना ठराव सोबत आणावा. सभेची उपस्थिती नोंदविण्यासाठी सभास्थळी ठेवण्यात आलेल्या उपस्थिती रजीस्टरवर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

२) ज्या सभासदांना योजनात्मक व धोरणात्मक सुचना करावयाच्या असतील अशा लेखी सूचना दिनांक १०.०८.२०२६ पर्यंत कारखान्याच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत (सुट्टीखेरीज) पोहोचतील अशा बेताने पाठवाव्यात.

३) उपविधीनुसार आवश्यक असलेली गणपुर्ती (कोरम) सभेच्या सुरुवातीस नसल्यास सभेचे कामकाज दोन तास स्थगित करून त्यानंतर विषय पत्रिकेप्रमाणे सभेच्या कामकाजाला त्याच ठिकाणी सुरुवात केली जाईल, त्यावेळी सभेला नियमाप्रमाणे गणपुर्तीची (कोरम) आवश्यकता राहणार नाही.